I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT
(Under Section 173 B.N.S.S)

## प्रथम खबर अहवाल
(बी एन एस एस संहिताच्या कलम 173 अन्वये)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण **P.S. (पोलीस ठाणे):** बार्शी शहर **Year (वर्ष):** 2025

**FIR No. (प्रथम खबर क्र.):** 0128 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/02/2025 20:30 वाजता

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence(गुन्ह्याची घटना):**

1 **Day (दिवस):** मधले दिवस **Date from (दिनांक पासून):** 12/02/2025 **Date To (दिनांक पर्यंत):** 13/02/2025

**Time Period (कालावधी):** **Time From (वेळेपासून):** 17:00 तास **Time To (वेळेपर्यंत):** 12:15 तास

(b) **Information received at P.S. (पोलीस ठाण्यावर माहिती मिळाल्याचा):** **Date (दिनांक):** 13/02/2025 **Time (वेळ):** 19:55 तास

(c) **General Diary Reference (ठाणे दैनंदिनी संदर्भ):** **Entry No. (नोंद क्र.):** 039 **Date and Time (दिनांक आणि वेळ):** 13/02/2025 19:55 तास

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S. (पोलिस ठाण्या पासून दिशा आणि अंतर):** पश्चिम, 4 कि.मी. **Beat No. (बीट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** बार्शी तालुका पोलीस ठाणे,

**(c) In case, outside the limit of this Police Station, then Name of P.S. (पोलीस ठाण्याच्या हद्दी बाहेर असल्यास, पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (State) (जिल्हा (राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार / माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** विशाल बालाजी फोपले

**(b) Father's/Husband's Name (वडिलांचे/पतीचे नाव):**

**(c) Date/Year of Birth (जन्मतारीख / वर्ष):** 2003 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No. (पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख ):** **Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID Details (Ration Card, Voter ID Card, Passport, UID No., Driving License, PAN) (ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पैन कार्ड))**

| S. No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्र क्रमांक) |
|---|---|---|

**(h) Occupation (व्यवसाय):**

**(i) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्ता प्रकार) | Address (पत्ता):: |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | बावीआ, ता बार्शी, जि सोलापूर , बार्शी शहर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |
| 2 | स्थायी पता | बावीआ, ता बार्शी, जि सोलापूर , बार्शी शहर, सोलापुर ग्रामीण, महाराष्ट्र, भारत |

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल क्र.):** 91-9096542461

**7.** **Details of known / suspected / unknown accused with full particulars (ज्ञात / संशयित / अज्ञात आरोपींचे संपूर्ण तपशील):**

**Accused More Than (अज्ञात आरोपी एका पेक्षा जास्त असतील तर संख्या):** 0

| **S. No. (अ.क्र.)** | **Name (नाव)** | **Alias (उर्फनाव)** | **Relative's Name (नातेवाईकाचे नाव)** | **Present Address(वर्तमान (पत्ता))** |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री सर्जेराव बाबुराव गायकवाड | | | 1. जैन मंदिराच्या बाजुस,Town/Village (शहर / गाव): अलीपुर रोड,बार्शी,Tehsil (तहसील): ता बार्शी,जिसोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): बार्शी शहर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |
| 2 | राहुल रमेश उंबरे | | | 1. Town/Village (शहर / गाव): मुपो बावी,Tehsil (तहसील): ता बार्शी,जि सोलापूर,Police Station (पोलीस ठाणे): बार्शी शहर,District (जिल्हा): सोलापुर ग्रामीण,State (राज्य): महाराष्ट्र,भारत |

**8.** **Reasons for delay in reporting by the complainant / informant ( तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे ):**

**9.** **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| **S. No. (अ.क्र.)** | **Propertty Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (विवरण)** | **Value(In Rs/-) मुल्य (रु. मध्ये)** |
|---|---|---|---|---|
| | | | | |

**10.** **Total value of property (In Rs/-) मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये) :**

**11.** **Inquest Report / U.D. case No., if any (मरणान्वेषण अहवाल/अकस्मात मृत्यू प्रकरण क्र. जर असल्यास):**

| S. No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.) |
|---|---|

**12. First Information contents (प्रथम खबर हकिगत):**

फिर्यादी जबाब दि.13.02.2025
मी विशाल बालाजी फोपले, वय- 22 वर्षे, व्यवसाय- शिक्षण, रा. मु.पो. बावी(आ), ता. बार्शी, जि. सोलापूर मो.नं.
9096542461 समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की,
मी वरील नमुद ठिकाणी माझे आई वडिल, आजी व मोठा भाऊ यांच्यासह राहणेस असून माझे बीसीए पर्यंतचे शिक्षण पुर्ण झाले असून सध्या पुण्यात एप्लीकेशन सपोर्टचे कोर्स करत आहे. माझी आई नामे सौ. मिना बालाजी फोपले हिने आमच्या गावातील दयानंद दिलीप आगलावे व वर्षा दयानंद आगलावे यांचेविरुध्द बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे तक्रार दिल्यावरुन गुन्हा रजिस्टर नंबर 06/2025 भारतीय न्याय संहिता कलम 75(2),79,118(1),115(2),352,351(1),3(5) प्रमाणे दि.13/01/2025 रोजी गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास पोलीस हवालदार सर्जेराव गायकवाड हे करीत आहेत.
दि.12/02/2025 रोजी सकाळी 9.43 वाजता आमच्या गावातील पोलीस पाटील नामे राहुल रमेश उंबरे यांनी मला फोन करुन माझ्या आईने दाखल केलेल्या गुन्हयाचे चार्जशिट कोर्टामध्ये दाखल करण्यासाठी पैसे लागतात, त्यासाठी पोलीस हवालदार गायकवाड यांना जावून भेट असे सांगितले. त्यानंतर मी दुपारी 12.00 वाजण्याचे सुमारास बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे जावून पोलीस हवालदार गायकवाड यांची भेट घेतली असता, त्यांनी माझ्या आईने दाखल केलेल्या गुन्हयाचे काम पुर्ण झाल्याचे सांगून कोर्टात चार्जशिट पाठवण्यासाठी रु.10,000/- दयावे लागतील असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना पैशे कशाचे असे विचारुन आम्ही फिर्यादी आहेत असे सांगितले असता, पोलीस हवालदार गायकवाड यांनी पैसे दिले नाहीतर चार्जशीट कोर्टात पाठवणार नाही असे सांगितले, त्यावेळी मी त्यांना माझ्या आईसोबत चर्चा करुन येतो असे सांगून निघून आलो.
त्यानंतर मी सदरबाबत माझा चुलत भाऊ गणेश मोहन फोपले यांच्याशी चर्चा केली असता, त्यांनी चार्जशीटसाठी फिर्यादीस पैसे दयावे लागत नाही असे सांगितले. पोलीस हवालदार गायकवाड हे लाचेची मागणी करीत असल्याचे लक्षात आल्यामुळे मी दुपारी 01.45 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक गणेश पिंगुवाले यांना फोन करुन संपर्क साधला व माझी तक्रार सांगितली.
त्यानंतर दि.12/02/2025 रोजी पोनि पिंगुवाले, शासकीय पंच व त्यांचे पथक बार्शी-कुर्डुवाडी रोडवरील जैन मंदिर येथे येऊन माझी व माझा चुलत भाऊ गणेश मोहन फोपले असे आमची भेट घेतली. सदरवेळी मी पोनि पिंगुवाले व त्यांच्या सोबत आलेल्या दोन शासकीय पंचासमक्ष पोलीस हवालदार सर्जेराव गायकवाड हे माझी आई सौ मिना फोपले यांनी फिर्याद दिल्यावरुन दाखल गुन्हयाचे चार्जशीट कोर्टात पाठवण्यासाठी म्हणून रु.10,000/- लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार सांगुन लेखी तक्रार दिली. सदरची लेखी तक्रार पोनि पिंगुवाले व पंचानी वाचून त्यावर त्यांनी सह्रा केल्या.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पडताळणी कारवाई करण्याच्या उद्देशाने पोनि पिंगुवाले यांनी मला पोलीस हवालदार गायकवाड यांची कोठे भेट होऊ शकते याबाबत विचारले असता, बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे त्यांची भेट होईल असे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर व नवीन मेमरीकार्ड दाखवून त्याची संपुर्ण माहिती मला तसेच दोन्ही पंचांना देवून व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकले. त्यानंतर सदर कारवाईकरीता पंच क्र.01 म्हणून संजय कोळी व पंच क्र.2 म्हणून शिवानंद नागूर असे काम करायचे सर्वानुमते ठरले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी पोलीस हवालदार गायकवाड यांची पडताळणी करण्यासाठी भेट घेण्यास सांगून पंच क्र.01 कोळीे व मला सर्व आवश्यक सुचना दिल्या आणि व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकावून 17.16 वा चे सुमारास माझ्याकडील मोटार सायकल क्र. MH 12 LZ 2232 यावरुन रवाना केले. मी व पंच क्र.1 कोळी असे बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे जावून पोलीस हवालदार गायकवाड यांची भेट घेतली. सदरवेळी पोलीस हवालदार गायकवाड यांनी पंचाबाबत विचारणा केली असता मी त्यांना मामा आहेत असे सांगितले. त्यानंतर त्यांनी बर बर..काय म्हणतो असे बोलून उजव्या हाताच्या बोटांनी इशा-याने पैशाबाबत विचारणा केली त्यावेळी मी त्यांना तेच एवढं..एवढ होणार नाय राव थोड कायतरी…थोडतरी कायतरी असे बोलून लाच रक्कम कमी करणेबाबत विचारले असता, पो.ह.गायकवाड यांनी सांग की बोल की असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना किती किती करायच. असे सांगितले असता, त्यांनी सांगितल की..सांगितल नाय का? असे बोलून लाच रक्कमेबाबत सकाळीच बोलले असल्याचे सांगितले. त्यावेळी मी त्यांना ते लय म्हणत होते असे बोलून सकाळी सांगितलेली लाच रक्कम जास्त होत असल्याचे सांगितले. त्यावेळी त्यांनी किती ? असे विचारले असता मी त्यांना दहा असे बोलून रु. 10,000/- असे सांगितले. त्यावेळी त्यांनी दे.. असे म्हणुन लाचेची रक्कम देण्यास सांगितले. त्यावेळी मी त्यांना कमी करा काय तरी पाच पाच असे बोलून लाच रक्कम तडजोड करुन रु. 5000/- कमी करण्याबाबत विचारणा केली असता, त्यांनी ठिक हाय ये.. दे असे म्हणून रु.5000/- लाच रक्कम देण्यास सांगितले. त्यावेळी मी कोणापाशी देऊ असे विचारलो असता, त्यांनी पाटलापशी असे बोलून लाच रक्कम पोलीस पाटील उंबरे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर पो.ह गायकवाड यांनी चार्जशीट देतो पाठवून असे सांगितले तसेच त्यांनी आईन पण दिलाय जबाब व्यवस्थित असे बोलून कामाबाबत चर्चा केली. त्यानंतर मी व पंच क्र.01 तिथून परत सापळा पथक थांबलेल्या जैन मंदिर या ठिकाणी येवून पोनि पिंगुवाले यांची भेट घेतली आणि घडलेली हकिकत सांगितली. सदरवेळी पोनि पिंगुवाले यांनी पंच क्र.01 कोळी व मला घडलेली हकिकत विचारून घेतली त्यानंतर त्यांनी व्हॉईसरेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण पंचासमक्ष ऐकले. त्यामध्ये मी व पंचाने सांगितल्याप्रमाणे संभाषण झाल्याचे दिसून आले आणि सदर पडताळणी कारवाईदरम्यान पोलीस हवालदार गायकवाड यांनी 5000/- रुपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. सदर लाच रक्कम पोलीस पाटील उंबरे यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे पडताळणी कारवाईत निष्पन्न झाले. त्यामुळे पोनि पिंगुवाले यांनी पोलीस पाटील उंबरे यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे ठरवून सापळापुर्व कारवाईबाबत माहिती देवुन मला व पंचाना अँथ्रासिन पावडरच्या गुणधर्माबाबत माहिती दिली, सदर वेळी मी हजर केलेल्या 500/- रुपये दराच्या एकूण 10 नोटांना त्यांचे स्टाफच्या हस्ते अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा माझ्या जिन्स पॅन्टीच्या पाठिमागच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी सापळा कारवाईच्या अनुषंगाने पोलीस

पाटील उंबरे यांना फोन करून भेटायला येत असलेबाबत सांगुन ते कुठे आहेत असे विचारण्यास सांगितले. त्यावेळी मी माझे मो.क्र.9096542461 वरुन पोलीस पाटील उंबरे यांना त्यांचे 7709575104 यावर फोन करून स्पीकर चालू ठेवला त्यावेळी मी त्यांना कुठे आहे याबाबत विचारणा केली केली असता त्यांनी कारे असे विचारले असता मी त्यांना आं..ती ह्रांच्याकड गेलो होतो..आपल गायकवाड साहेबांकड..तुम्ही सांगितल होत ना असे सांगितले असता, पोलीस पाटील उंबरे यांनी हां..हां..हां.. असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना मग त्यांनी निरोप दिलाय तुम्हाला भेट म्हणल्यात..पैशासाठी..पैसे दे म्हणल्यात पाच हजार रुपये तुमच्याकड असे सांगितले. त्यावेळी फोन कट झाल्याने मी पुन्हा पोलीस पाटील उंबरे यांना कॉल करुन अओ म्हणल ती तुमच्याकड द्यायला लावलय ओ असे सांगितले असता त्यांनी मी कुठे आहे याबाबत विचारणा करुन बर बर सकाळी फोन करतो तुला असे बोलून उदया कॉल करतो असे सांगितले. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी उदईक रोजी पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरवुन दि.12/02/2025 रोजीची कारवाई स्थगित केली.

त्यानंतर आज दि.13/02/2025 रोजी सकाळी 10.00 वाजता पोनि पिंगुवाले व त्यांचे पथक सोलापूर बार्शी रोडवरील व्हि के मार्ट येथे येऊन माझी व माझा चुलत भाऊ गणेश मोहन फोपले असे आमची भेट घेतली. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी आम्हाला पोलीस पाटील उंबरे यांची भेट कोठे होईल असे विचारणा केली असता, आम्ही ते एस एस अॅग्रो, मार्केट यार्ड या दुकानात असतात असे सांगितले. त्यानंतर दि.12/02/2025 रोजी मी हजर केलेल्या नोटा ज्या पोनि पिंगुवाले यांनी त्यांच्याकडे सुरक्षितरित्या लखोट्‌यामध्ये घालून ठेवले होते, त्या लखोट्‌यातून बाहेर काढल्या आणि पुन्हा त्यांचे अंमलदार यांच्याकडून सदर नोटांना अॅन्थ्रासीन पावडर लावून मी नेसलेल्या जीन पॅन्टच्या पाठीमागच्या डाव्या बाजूच्या खिशात ठेवले. त्यानंतर मला व पंच क्र.1 यांना सर्व आवश्यक सुचना देऊन पोलीस पाटील उंबरे याची भेट घेण्यासाठी रवाना केले. मी व पंच क्र.1 दोघे एस एस अॅग्रो येथील दुकानात जाऊन पोलीस पाटील उंबरे यांची भेट घेऊन काल.. काल गेलतो साहेबाकड असे सांगितले. त्यावर त्यांनी बर असे बोलल्यानंतर मग त्यानी सांगितल होत चार्जशिट पाठवायच.. पैसे मागितले असे सांगितले असता त्यांनी पंचाबाबत माझ्याकडे विचारणा केली. त्यावर मी माझ्यासोबत आलेले पंच हे माझे मामा आहेत असे सांगितले आणि चर्चा सुरू ठेवली. सदरवेळी मी दहा हजार लागतेत म्हणत होता चार्जशिटला.. मग असे म्हणून पोलीस हवालदार गायकवाड हे 10,000/- रू लाचेची मागणी करीत असल्याचे पोलीस पाटील उंबरे यांना सांगितले असता, त्यांनी जाऊदे मी सांगतो त्यांना.. बोलतो साहेबाशी असे सांगितले. त्यानंतर मी पोलीस पाटील उंबरे यांना मग ते म्हणले पाच हजार रूपये द्या म्हणले पाटलाला असे बोलून पोलीस हवालदार गायकवाड यांचा निरोप दिला असता मी बोलतो त्यांना असे सांगितले त्यानंतर पुन्हा काही चर्चा करून मी बोलतो साहेबांना असे म्हणून फोन करतो असे सांगितले. त्यामुळे मी व पंच तिथून निघून पोनि पिंगुवाले यांची भेट घेऊन घडलेली हकिकत सांगितली.

पोलीस पाटील उंबरे हे साहेबांशी बोलून फोन करतो असे सांगितले असल्याने आम्ही काहीवेळ त्यांच्या फोनची वाट पाहिली परंतू त्यांचा फोन न आल्याने पोनि पिंगुवाले यांनी पोलीस पाटील उंबरे यांची समक्ष जाऊन भेट घेण्याची सुचना दिली. त्यावेळी मी माझा चुलत भाऊ गणेश फोपले यास सोबत पाठवण्याची विनंती केल्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी मला, माझा चुलत भाऊ गणेश फोपले,

दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदारांना त्यांच्या कामाच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पोनि पिंगुवाले यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून 11.42 वा मला व पंच क्र. 1 कोळी यांना पोलीस पोटील उंबरे यांना भेटायला माझ्याकडील मोटार सायकल क्र. MH 12 LZ 2232 यावरुन व माझा चुलत भाऊ गणेश फोपले यास त्याचे मोटार सायकल क्र MH 13 EQ 3781 यावरुन रवाना केले. आमच्या पाठोपाठ पोनि पिंगुवाले, सापळा पथकातील अंमलदार व पंच क्र.2 हे शासकिय वाहनाने आमच्या पाठीमागे येवून बस स्टँडच्या अलिकडे शासकिय वाहन थं ाबले, आम्ही एस.एस.अॅग्रो दुकानाजवळ गेलो असता, पोलीस पाटील उंबरे यांनी माझा चुलत भाऊ गणेश फोपले यास पुढे तुळजापूर चौकात जावून थांबण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी, माझा चुलत भाऊ गणेश व पंच क्र.1 असे तुळजापूर चौकात जात असताना माझी माटार सायकल बंद पडल्याने आम्ही मोटार सायकल ढकलत तुळजापूर चौकात गेलो व आमच्या पाठीमागे पोनि पिंगुवाले हे पथकासह शासकिय वाहनाने तुळजापूर चौकाचे अलीकडे वाहन थांबवून ते पायी चालत येवून कोणास संशय येणार नाही अशारितीने सापळा लावून थांबले. मी, चुलत भाऊ गणेश व पंच क्र. 1 असे माझी मोटारसायकल चालू करण्यासाठी किक मारत असताना पोलीस पाटील उंबरे त्यांच्याकडील मोटार सायकल क्र. MH 13 CZ 7081 यावरुन आले, त्यावेळी त्यांनी माझ्या मोटारसायकलबाबत विचारणा करुन त्यांनी चालू करण्याचा प्रयत्न केला परंतु ते चालू झाले नाही. त्यानंतर आमच्यामध्ये चर्चा सुरू असताना चुलत भाऊ गणेश फोपले यांनी पोलीस पाटील उंबरे यांना ते म्हणलेल तुमच्याकड द्या.. म्हणून तर म्हणल.. ही काय ह्राचा मला फोन आला.. ते म्हणल तुम्हाला द्या… मी म्हणल असे सांगितले असता, पोलीस पाटील उंबरे यांनी आणलीय का? असे बोलून हाताच्या इशा-याने लाच रक्कम देण्यास सांगितले, त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या खिशातील लाच रक्कम काढून त्यांना दिली असता, त्यांनी ती स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या मागच्या डाव्याबाजुच्या खिशात ठेवली. त्यावेळी माझे चुलत भाऊ गणेश फोपले यांनी पोलीस पाटील उंबरे यांना मोजून घ्या एकदा.. तेवढ सांगा गायकवाड साहेबांना ते म्हणतील असे सांगितले, त्यावेळी चर्चेदरम्यान त्यांनी मला काल तू पोलीस स्टेशनमध्ये गेलो होता वाटत तू असे बोलून काल संध्याकाळी मी परत पोलीस ठाण्यात गेले असल्याचे सांगून त्यांचे मोटारसायकल चालू करून जात असताना मी माझ्या डोक्यावरुन हात फिरवुन लाच रक्कम स्विकारल्याचा इशारा केला, त्यावेळी बाजुस थांबलेले पोनि पिंगुवाले व सापळा पथक यांनी पोलीस पाटील यांची मोटार सायकल थांबवून त्यांना ताब्यात घेतले. त्यावेळी पोनि पिंगुवाले यांनी माझे गळयातील व्हॉईस रेकॉर्डर काढून तो बंद करुन ताब्यात घेतला. त्यानंतर पोलीस पाटील यांनी स्विकारलेली लाच रक्कम पंच क्र.2 यांनी पोनि पिंगुवाले यांच्या सूचनेप्रमाणे ताब्यात घेतल्यानंतर सापळा कारवाई नंतरच्या प्राथमिक तपासण्या शासकिय वाहनात कृत्रीम अंधार करुन करण्यात आले. त्यानंतर झालेल्या कारवाईबाबत श्री दिलीप ढेरे सहा. पोलीस निरीक्षक, बार्शी तालुका पोलीस ठाणे यांना माहिती देवून पुढील सविस्तर पडताळणी, सापळापुर्व व यशस्वी सापळा पंचनामा तसेच इतर आवश्यक कार्यवाही शासकिय विश्रामगृह, बार्शी येथे पुर्ण करण्यात आले.

तरी दि.12/02/2025 रोजी 17.00 ते आज दि.13/02/2025 रोजी 12.15 वा चे दरम्यान लोकसेवक क्र.1.सर्जेराव बाबुराव गायकवाड, पद- पोलीस हवालदार ब.नं. 929, नेम- बार्शी तालुका पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, राहणार- जैन मंदिराच्या बाजुस, अलीपुर रोड, बार्शी, ता. बार्शी, जि.सोलापूर यांनी बार्शी तालुका पोलीस ठाणे येथे माझ्या आईने दाखल केलेल्या गुन्हयाचे चार्जशिट मा.कोर्टात

**I.I.F.-I (एकीकृत अन्‍ वेषणफॉर्म - १)**

पाठविण्यसाठी म्हणुन स्वत:करीता कायदेशीर परिश्रमिकाखेरीज अन्य पारितोषण म्हणुन रु.10,000/- लाचेची मागणी करुन तडजोडीअंती रु.5000/- लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम हि पोलीस पाटील राहुल उंबरे यांच्याकडे देण्यास सांगितले. त्यानंतर सापळा कारवाईदरम्यान पोलीस पाटील उंबरे यांना पोलीस हवालदार गायकवाड यांनी मागणी केलेल्या लाच रकमेबाबत माहिती देऊन सदर लाच रक्कम त्यांच्याकडे देण्यास सांगितले आहे असे सांगितले असता, त्यांनी सदर रक्कम लाच आहे हे माहित असताना पोलीस हवालदार गायकवाड यांच्याकरीता म्हणुन 5000/- रू. लाच रक्कम स्विकारुन बेकायदेशीर आर्थिक फायदा मिळवुन गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले आहे म्हणून माझी लोकसेवक 1) श्री सर्जेराव बाबुराव गायकवाड, पद- पोलीस हवालदार बं.नं. 929, नेम- बार्शी तालुका पोलीस ठाणे, सोलापूर ग्रामीण, राहणार- जैन मंदिराच्या बाजुस, अलीपुर रोड, बार्शी ता. बार्शी, जि.सोलापूर व इतर लोकसेवक 2) राहुल रमेश उंबरे, वय-32 वर्षे, पद- पोलीस पाटील बावी, रा. मु.पो. बावी, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा आपले कडील लॅपटॉपवर टंकलिखीत करण्यात आलेला असून त्याची पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला. स.ता.म.

(गणेश पिंगुवाले)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध दिसून आल्यामुळे):**

**(1)** **Registered the case and took up the investigation (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Balaji Ankush Kukade (पोलीस निरीक्षक) **or (किंवा):**

**(2)** **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):** **Rank (हुद्दा):**

**No. (क्र.):** **to take up the Investigation (तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3)** **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**
**or (किंवा)**

**(4)** **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):** **on point of jurisdiction (अधिकाराच्या दृष्टिकोनातून).**

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant /informant, free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली)**

**R.O.A.C. (आर.ओ.ए.सी.)**

**Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Balaji Ankush Kukade

**Rank (हुद्दा):** I (Inspector)

**No. (क्र.):** POBN85353

**14.** **Signature / Thumb impression of the complainant / informant (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा)**

**15.** **Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषणफॉर्म - १)

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील)**

| S. No. (अ.क्र) | Sex (लिंग) | Date / Year Of Birth (जन्मतारीख वर्ष) | Build (बांधा) | Height (cms) (उंची(सें.मी) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |
| 2 | पुरुष | | | - | | चेचक: क्र. |

| Deformities / Peculiarities (व्यंग वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eye (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit (s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |
| | | | | | |

| Language/Dialect (भाषा/बोली) | Place of (चे ठिकाण) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल)**